# इतिहासाचार्य राजवाडे यांचे सामाजिक व राजकीय विचार – एक मार्क्सवादी अभ्यास

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे हे आधुनिक महाराष्ट्रातील एक बंडखोर विचारवंत होऊन गेले. त्यांनी एकाच दमात अतिशय क्रांतिकारी व अतिशय प्रतिगामी विचार मांडले. त्यामुळे त्यांच्याकडे प्रागतिक विचारांच्या लोकांनी दुर्लक्ष केले. पण आता हळूहळू त्यांच्या क्रांतिकारक विचारांकडे लोकांचे लक्ष जात असून, त्यांच्या विचारांचा नव्या दृष्टिकोणातून अभ्यास सुरू झाला आहे ही स्वागतार्ह बाब आहे.

(१)

भारतामध्ये इंग्रजी राज्य आल्यानंतर इंग्रजी शिक्षणपद्धतीमुळे एक नवा मध्यमवर्ग महाराष्ट्रात उदयास आला. या मध्यमवर्गातील एक प्रभावी गट हळूहळू मवाळांच्या प्रभावाखालून निसटला व टिळक–चिपळूणकर यांच्या वैचारिक प्रभावाखाली आला. या वर्गाने राष्ट्रसेवेसाठी वेगवेगळे मार्ग स्वीकारले. त्यात इतिहाससंशोधन हा एक मार्ग होता. भारताचे पुनरुत्थान जर करावयाचे असेल तर भारतीयांनी सर्वप्रथम आपले आत्मस्वरूप ओळखले पाहिजे हे विष्णुशास्त्र्यांचे मत त्यांनी स्वीकारले कारण राष्ट्राच्या पुनर्निर्माणामध्ये इतिहास व तत्त्वज्ञान यांचे स्थान महत्त्वाचे आहे. इंग्रज इतिहासकारांनी भारतीयांचे जे इतिहास लिहिले आहेत ते अज्ञानमूलक व राजकीय हेतूंनी प्रेरित आहेत म्हणून आपल्या परंपरेचा डोळस व शास्त्रीय पद्धतीने अभ्यास केला पाहिजे असे या लोकांचे मत होते. राजवाडे या विचारवंतांतील एक अतिशय प्रज्ञावंत विचारवंत होऊन गेले.

---

परामर्श, खंड ७ अंक ४, फेब्रुवारी १९८६

राजवाडे ज्या मध्यमवर्गाच्या विचारांनी बहुश: प्रेरित झालेले होते तो मध्यमवर्ग भारतीय वेदांताधारित अध्यात्मवादाच्या आधारावर आपली राष्ट्रवादाची संकल्पना मांडीत होता. टिळक व अरविंद हे या विचारांचे मोठे पुरस्कर्ते. पण या आध्यात्मिक राष्ट्रवादाच्या बाहेर जावून भौतिकवादी विचारपद्धती स्वीकारण्याचा प्रयत्न आपल्या आयुष्याच्या शेवटच्या काळात राजवाड्यांनी केलेला दिसतो. त्यांचा हा सारा खटाटोप समाजाला आत्मप्रत्यय आणून देण्यासाठीच होता.

राजवाडे यांनी हेगेल, कॉम्ट, नित्शे वगैरे अनेक विचारवंतांच्या विचारांच्या साहचाने आपले इतिहासविषयक विचार मांडले. ते चिपळूणकरी विचारपरंपरेतील असल्यामुळे त्या विचारपरंपरेतील सर्व गुणदोष तीव्रतर स्वरूपात त्यांच्यात प्रादुर्भूत झालेले आढळतात. नंतरच्या काळात राजवाडे यांनी इतके मूर्तिभंजक विचार मांडले की त्यांच्या एका टीकाकाराने त्यांच्या काही देवविषयक विचारांची लेनिनच्या विचारांशी तुलना करून ते एक कम्युनिस्ट होते असा आरोप त्यांच्यावर केला.[१] प्रस्तुत लेखात राजवाडे यांच्या सामाजिक, राजकीय व इतिहासविषयक विचारांचा मार्क्सवादी दृष्टिकोणातून अभ्यास करण्यात आलेला आहे.

(२)

राजवाडे यांनी आपले इतिहासविषयक विचार 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' च्या सहाव्या खंडाच्या विस्तीर्ण प्रस्तावनेत मांडलेले आढळतात. राजवाड्यांची इतिहासपद्धती शास्त्रीय होती. आणि जर्मनीमध्ये ज्याप्रमाणे रँकेने इतिहासशास्त्रात क्रांती घडवून आणली त्याच प्रकारची क्रांती राजवाडे यांनी महाराष्ट्रात घडवून आणली असे डॉ. श्री. पुणतांबेकर यांचे मत आहे.[२] इतिहासाची व्याख्या सांगताना राजवाडे लिहितात, "मानवसमाजाच्या अस्तित्वाला व हालचालीला समाज व संस्थारूप यंत्राची आवश्यकता आहे. त्यांचा उदय, वृद्धी व क्षय कालांतराने कसा झाला हे वर्णन करण्याचे काम इतिहासाला जरुरीचे आहे. कारण इतिहासात मानवी संस्थांचा, विचारांची, नीतीचा व राज्ययंत्राचा स्थल, काल व प्रसंग या संदर्भात अभ्यास करावयाचा असतो." इतिहास हा जास्तीत जास्त निष्पक्षपातीपणे लिहिला पाहिजे हे सांगत असताना ते कबूल करतात की झाडून सारे पूर्वग्रह टाकणे मनुष्यस्वभावास निसर्गत:च

अशक्य आहे कारण माणूस ज्या संस्कृतीत जन्मतो, वाढतो, ह्या संस्कृतीतील विचार, विकार व संस्था त्याचे मन प्रभावित करतात. [३]

इतिहास लिहिण्याच्या कालानुक्रमिक, दैशिक व कौलिक पद्धती आहेत आणि या तीन पद्धतीत त्यांना कौलिक (Ethnographical) पद्धती जास्त स्वीकारार्ह वाटते कारण या पद्धतीत मनुष्यस्वभावाच्या धोरणाने इतिहास लिहिलेला असतो म्हणून तो सुबोध, सुसंगत व स्पष्ट होतो. इतिहासलेखनात इतरही पद्धती कधी कधी वापराव्या लागतात हे ते मान्य करतात.

इतिहासाचा मुख्य नायक मनुष्य असून तो आपले कार्य विशिष्ट स्थल व काल यांच्या संदर्भात करीत असतो. माणसाखेरीज कालास काहीच किंमत नसते. ते लिहितात. "कोणत्याही प्रसंगाचे वर्णन द्यावयाचे म्हणजे त्या प्रसंगाचा परिष्कार विशिष्ट कोणत्याही कालावर व विशिष्ट स्थलावर पसरवून दाखविला पाहिजे. त्यातूनचमग प्रत्येक कालाचे वा युगाचे युगमाहात्म्य (Spirit of epoch) हे काय आहे ते लक्षात येते."[४] इतिहास हा मानवसमाजशास्त्राचा भाग आहे. इतिहासाकडे पहाण्याच्या अनुनायक (Inductive) आणि निर्णायिक (deductive) अशा दोन पद्धती असून अनुनायक पद्धतीचा अवलंब करणारे समाजशास्त्री वास्तववादी असून निर्णायक पद्धतीचा अवलंब करणारे काल्पनिक तत्त्वज्ञ होत. त्यांचे असे मत होते की व्यावहारिक सत्य शास्त्रज्ञांच्या बाजूचे आहे. त्यांनी असेही मत व्यक्त केले की मानवसमाजशास्त्राच्या विकासामुळे काल्पनिक तत्त्वज्ञानाच्या मर्यादा कमी होत आहेत. [५]

इतिहासकाराने युगमाहात्म्य समजून घेतले पाहिजे कारण माणूस हा स्थल व कालसंबद्ध आहे. मानवी मनोरचना घडविण्यात भोवतालच्या परिस्थितीचा मोठाच हात असतो. राजवाडे लिहितात. "तात्त्विक कल्पनांचा व मानवसमाजाच्या चरित्राचा संबंध बिंबप्रतिबिंबरूप आहे. जे तात्त्विक बिंब मनात निर्माण होत असेल त्याचे प्रतिबिंब समाजात प्रतिफलित होते." [६] कारण "मनुष्याच्या पिंडावर बाह्यसृष्टीचे आधात होतात. आघातांचे सातत्य होऊन मनोरचना बनते. सृष्टी ही मनोरचनेचे उर्फ स्वभावाचे बाह्यकारण होते आणि कृत्यरूपाने फलद्रूप होणारा स्वभाव कृत्यांचे अंत:कारण ठरतो." [७] राजवाडे पुनः पुनः बजावून सांगतात की मनुष्य हा 'नखशिखांत पडदानशीन' प्राणी आहे. त्याची ओळख काल व स्थान याशिवाय पटणार नाही. व त्यालाही दिक् आणि काल याशिवाय कशाचीही ओळख पटत नाही. हे असे का घडते याचे स्पष्टीकरण ते पुढे करतात; "जी भाषा, ज्या संस्था, जी परिस्थिती मनुष्याच्या मनाची

रचना करते त्या भाषेला, त्या संस्थेला व परिस्थितीला सोडून मनुष्य एक वाक्यही इतिहास म्हणून उच्चारू शकत नाही." [८]

इतिहासाची स्थल, काल व व्यक्ती यांच्या संदर्भात व्याख्या करून राजवाडे इतिहासाच्या भौतिक व आत्मिक बाजू स्पष्ट करतात. ते लिहितात, "भौतिकबाजूने कोणत्याही राष्ट्राच्या राजकीय गतिस्थितीचा विचार करावयाचा म्हणजे त्या राष्ट्रात झालेल्या अंत:स्थ व बहि:स्थ कलहांची उदाहरणे द्यावयाची म्हणजे राष्ट्राच्या बंडाची, निरनिराळ्या पक्षांच्या, जातींच्या व वर्गांच्या चढाओढीची व परराष्ट्रांतील लढायांची वर्णने द्यावयाची आणि आत्मिक स्थितीने राष्ट्राच्या गतिस्थितीचा विचार करावयाचा म्हणजे अंत:स्थ व बहि:स्थ कलहांच्या उत्पत्तीची कारणे त्या राष्ट्रातील एकंदर लोकसमूहात आत्म्याच्या उन्नतावनत वृत्तींपैकी कोणत्या वृत्तीचे प्राधान्य आले याचा सूक्ष्म विचार व त्या राष्ट्रातील मोठमोठ्या तटातील पुरुषांच्या राजकीय मताचे सशास्त्र दर्शन इत्यादि मतांची चर्चा करावयाची." [९] येथे राजवाडे आत्मिक हा शब्द आध्यात्मिक या अर्थाने वापरीत नाहीत तर तो शब्द त्यांनी समाजान्तर्गत विविध प्रकारे कार्यरत असणाऱ्या विचारशक्तींच्या व मनोधारणांच्या संदर्भात वापरलेला आहे.

इतिहासाचा अभ्यास हा विविध मानवनिर्मित संस्थांचा अभ्यास आहे कारण या संस्थांचे कार्य व्यक्तींचे पोषण व संरक्षण, प्रजोत्पादन व प्रजाशिक्षण हे आहे. मानवी वासना पूर्ण करण्यासाठी झटणाऱ्या विविध संस्थांची रचना त्यांचे स्वरूप व त्यांची सुधारणा हेच सर्वकाल राष्ट्राचे कर्तव्य बनून बसते आणि या सर्व बाबींचा कार्य-कारण स्वरूपात तपास करण्याचे महत्त्वाचे कार्य इतिहासास बजवावे लागते. [१०] राजवाडे यांनी इतिहासविषयक ही भूमिका घेतली ती पूर्णत: भौतिकवादी होती आणि त्यांच्या काळात प्रचलित असलेल्या पाश्चात्य इतिहासविषयक विचारांचा त्यांच्या विचारांवर परिणाम झालेला होता.

## (३)

विचार आणि विकारांच्या साधनांचा मानवाच्या ठायी कसा उदय झाला व या साधनांच्या साह्याने माणसाने आपला विकास कसा करून घेतला याबाबतचा आलेख राजवाड्यांनी त्यांच्या 'विकार व विचारप्रदर्शनाच्या साधनांची इतिहासपूर्व व इतिहासोत्तर उत्क्रांती' या निबंधात मांडलेला दिसून येतो. ते लिहितात "प्राणित्वाची घटनाच अशी आहे की आंतर किंवा बाह्य कारणांचा

आघात झाला असता प्रत्याघात या प्रकारांचे रूप घेऊन प्रगट होतो. सहज विक्षेपांचे प्रत्यभिज्ञान होऊन, यत्नाने त्याची पुनरावृत्ती करण्याची बुद्धी होणे ही त्याची पुढची पायरी आहे. त्याचें ज्ञान फक्त मनुष्यासच असते. "[११] त्यातूनच हळूहळू माणूस भाषा तयार करतो. भाषा म्हणजे दुसरे तिसरे काही नसून मुखातून निघू शकणाऱ्या शब्दांनी क्रियांचे, पदार्थांचे आविष्करण करण्याची कला, अनुकरणात्मक ध्वनींच्याद्वारा आपले मनोगत दुसऱ्यांना कळविण्याचा किंवा आपले भूत मनोगत वर्तमानकाळी स्वत:चे स्वत:स प्रत्यक्ष करण्याचा हा शोध मनुष्यमात्राच्या प्रगतीस कल्याणकारक झाला. ज्या समाजात हा शोध प्रथम झाला त्याला ज्या समाजात हा शोध अद्याप आला नव्हता त्या समाजावर हरएक प्रकारे वर्चस्व मिळाले. पाश्चात्यांनी विज्ञानाचे आधारे हिंदु, चिनी व निग्रो लोकांवर याच प्रकारे वर्चस्व मिळविले.[१२]

उत्क्रांतीतून माणसाने जातिनामे तयार केली पण शास्त्रीय ज्ञानाच्या अहंकाराने तो जातिकल्पना मनुष्याच्या डोक्यात स्वयंभू आहे आणि भूत भविष्य वर्तमान सर्व व्यक्तींना व्यापून जाती असते असा निरर्गल सिद्धांत ठोकून देवू लागला. वस्तुत: जातिनामे भाषेच्या व बोलण्याच्या सोयीकरिता केवळ सांकेतिक असतात हे त्याच्या परवापरवापर्यंत लक्षात येईना. त्या नामांनी दर्शविलेला अर्थ मूर्त नसून केवळ मानसिक असतो. माणसाच्या विकासास जातिनामांनी महत्त्वाचा कार्यभाग पार पाडला. यातूनच विविधकलांचा विकास झाला. पण ज्या बाबींचा उगम, विकास व क्षय माणसास समजू शकला नाही त्या ईश्वराने निर्माण केल्या अशी त्याविषयी त्याच्या मनात भ्रांती निर्माण झाली. राजवाडे लिहितात "अज्ञातोद्भव शबल साधने केवल भ्रांतिकृत असतात पण मनुष्य तसे समजत मात्र नाही. उलट ती वास्तवापेक्षा जास्त खरी आहेत असे त्यास वाटते. मनानेच दुष्ट व सुष्ट देवांची कल्पना करून ते अदृश्य प्राणी रागावले म्हणून पूजा, प्रार्थना, नैवेद्य वगैरे बळी देवून त्यांची मर्जी संपादिण्याचे प्रयत्न त्यांनी केले. हे एक नवे जग त्याने निर्माण केले आणि ते जग खरे व मेल्यावर त्या खऱ्या जगात आपण अक्षय्य रहावयास जाणार. इतकेच नव्हे तर हे आपले दोन दिवसांचे साधे जग खोटे आणि खोटे नसले तर क्षणिक वगैरे तर्कपरंपरा बांधीत तो त्या खऱ्या परलोकावर बेसुमार आसक्त झाला. खरेच खरे होते त्यास त्याने खोटे ठरविले आणि निव्वळ खोटे जे होते त्यास त्याने खरे ठरविले."[१३] यातूनच स्वर्ग, नरक, देव वगैरे कल्पना निर्माण झाल्या. "देवाची व देवीची गरज कोठपर्यंत— संकटकालीन

उपाय सुचत नाही तोपर्यन्त. संकटनिवारणाचे जसजसे उपाय मनुष्यास सुचतात तसतसे तेवढचापुरता देवाला कमी त्रास द्यावयाचा वा त्यास काढून टाकावयाचा मनुष्याचा परिपाठ आहे" कारण "कार्याचे खरे कारण जेथे जेथे सापडले नाही, तेथेतेथे भूत किंवा देव हे कारण अज्ञ माणूस कल्पीत आला आहे व खरे कारण सापडले म्हणजे भूतकारणास व देवकारणास रजा देण्याची त्याची वहिवाट आहे."[१४] शुद्ध शास्त्रज्ञान जसजसे वाढत जाईल तसतसा भ्रांत कल्पनांचा लोप होतो. हा लोप कालांतराने झाला पाहिजे हे खरा इतिहासकार जाणत असतो व तो लोप मंदगतीने होत आहे याचे ह्याला दु:ख होते. राजवाडे स्पष्टच सांगतात की देवकल्पना, नीतिकल्पना, कार्यकारण या सर्व कल्पना उत्क्रांतीतून जन्मलेल्या आहेत; त्या स्वयंभू वा ईश्वरनिर्मित नाहीत. माणूस हा रानटी अवस्थेतून सुधारलेल्या अवस्थेस इतिहासकाळात उत्क्रांतीच्या मार्गाने प्राप्त झाला हे सत्य राजवाडयांनी या निबंधात फार उत्तम पद्धतीने मांडले आहे.

देवकल्पना भ्रांत असून या देवकल्पनेमुळे भारतात एकसमाज व एकराष्ट्र निर्मिती झाली नाही असे मत राजवाडयांनी महिकावतीच्या बखरींच्या प्रस्तावनेत जोरकसपणे मांडलेले आढळते. उत्तर कोकणातील प्रजा एक समाज झालेली नव्हती आणि एक देवकल्पना घेतली तरी "कातकरी पिशाचपूजक होता, यहुदी ख्रिस्ती व मुसलमान मनुष्याकार–एकदेवपूजक होते. पारशी अग्निपूजक होते आणि हिंदु पशुपक्षिमनुष्याकार–अनेकदेवपूजक असून अग्न्यादि पंचभूते, पिशाच्चे, एक देव, झाड व दगड यांचा भक्त होता. एवढेच नव्हे तर स्वत:च देव, ईश्वर व ब्रह्महो होता. देव एक आहे हे जितके खरे तितकेच ते कोटचवधि आहेत हेही खरे असल्यामुळे; दोन्ही कल्पना केवळ बागुलबुवाप्रमाणे असत्य असल्यामुळे कातकरी, हिंदु, मुसलमान, पारशी व ख्रिस्ती हे निराधार व अवास्तव देवकल्पनांच्या पाठीमागे धावत होते व आपापल्या कल्पनांचा अनिवार उपभोग घेण्यात सौख्य मानीत होते."[१५] ते पुढे म्हणतात, "अशा या नानाप्रकारच्या देवकल्पनांनी पछाडलेल्या गटांचा एक भरीव समरस समाज बनवावयाला एकच तोडगा होता. तो हा की या सर्वांच्या डोक्यातील निराधार व अशास्त्र अशी जी देवकल्पना तीच मुदलातून उपटून काढली पाहिजे होती. निदान एकसमाजप्रीत्यर्थ या देवकल्पनेला व देवधर्माला गबाळात गणून इतर राजकीय, वैय्यापरिक व शास्त्रीय व्यवहारात तिला नितांत गौणत्व दिले पाहिजे होते. देवकल्पनेचे हे असत्य युग चार–पाच हजार वर्षे

चालून समाप्तीस येण्याचे रंगात आहे. हे ह्या देवभोळ्या लोकांच्या अद्याप लक्षात आले नव्हते."[१६] नुसती देवकल्पनाच नव्हे तर वंश व जातिकल्पना पण एकसमाजत्वास अडचण आणीत होत्या. पण देव, वंश व जाती या तीन कल्पनांचे बेसुमार पान करून उत्तर कोकणातील लोक झिंगले होते, त्यामुळे त्यांच्यामध्ये एकराज्यत्वाची कल्पना निर्माण झाली नाही.

माणूस हा पाशवावस्थेतून उत्क्रांत झाला असून देवकल्पना त्याच्या अज्ञानातून उद्भवली आहे असे राजवाडे यांचे मत होते. माणसाच्या कल्पनाच नव्हे तर संस्था देखील उत्क्रांतीच्या मार्गाने विकसित झालेल्या आहेत हे राजवाडे यांनी 'भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास' या आपल्या अतिशय क्रांतिकारक पुस्तकात सिद्ध केले आहे.

## (४)

"भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास" हे पुस्तक अपूर्ण आहे कारण नंतरचे महत्त्वाचे प्रकरण राजवाड्यांनी लिहिलेले नाही. या पुस्तकात शास्त्रीय पद्धती वापरून त्यांनी प्राचीन भारतातील विवाहसंस्थेचा इतिहास वर्णिण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी त्यांनी लॅटार्न्यूच्या पुस्तकाचे साहय घेतलेले दिसते. त्यांनी जी टिपणे तयार केली त्यात पण खूप स्फोटक मसाला भरलेला होता. उदा. नातेविषयक संबंधांचे मूळ अर्थ ते याप्रकारे सांगतात.

१) पितृ – टोळीचे पालन व रक्षण करणारा.

२) मातृ – (मा. मोजणे) टोळीतील सर्वांस अन्न मोजून देणारी.

३) दुहितृ – टोळीतील दूध काढणारी.

४) स्वसृ – आपल्याच लोकात राहणारी व आपल्या बंधूशीच विवाह करणारी.

५) पत्यृ – स्वतःचे घर, स्वतंत्र घर बांधणारी.

६) पत्नी – घराची व्यवस्था पाहणारी. (दोन्ही शब्द जेव्हा टोळीजीवन संपून वैयक्तिक कुटुंब जीवन सुरू झाले त्यावेळचे)

७) नणंद – एका टोळीतून दुसऱ्या टोळीत बळजबरीने नेलेल्या मुलीबद्दल सहानुभूती बाळगणारी

८) श्वश्रू – टोळीत बाहेरून आलेल्या व पळून जाणाऱ्या मुलीवर कुत्री सोडणारी.

९) श्वशुर – कुत्री सोडणारा.
१०) भ्रातृ – टोळीस पोसणारा, टोळीसाठी अन्न आणणारा.
११) भर्तु – मुलींना बळजबरीने पळविणारा.
१२) भार्या – हार्या – पळवून नेलेली.
१३) देवृ – सवतीबद्दल दया व सहानुभूती दाखविणारी.[१७]

श्रीकृष्णाचे विविध नावांचा खरा अर्थ ते याप्रमाणे सांगतात.

१) गोविंद – गाई मिळविणारा.
२) गोपाळ – गाईचे पालन करणारा.
३) कृष्ण – लूटमार करणारा.
४) हरि – जनावरे चोरणारा.[१८]

माणसाचा विकास पाशवावस्थेतून झाला, त्यातूनच त्याच्या नीतिविषयक कल्पना घडल्या, बदलल्या. राजवाडे लिहितात. " या उत्क्रमिष्णू जगात सर्वच वस्तूंना जंगमत्व असल्यामुळे नीति ही वस्तूदेखिल उत्क्रमिष्णु आहे, स्वयंभू स्थाणु किंवा स्थिर नाही. त्या काळी ती ती चाल नीतिमत्तेची वाटते एवढेच. तो काळ पालटला व समाजात अंतर्घषणाने किंवा बाह्य प्रेरणेने बदल झाले म्हणजे ती जुनी व वहिवाटेतून गेलेली किंवा जात असलेली चाल नीतिबाह्य व चमत्कारिक भासून तिची गणना गर्ह्य वस्तूत होते. "[१९] माणूस हा वंशाने पाशव आहे म्हणून प्राथमिक वन्य मनुष्यात काही काही बाबतीत पशूंचे आचरण दृष्टीस पडते. पाशवावस्थेतनंतर माणसामाणसामध्ये कोणत्याही प्रकारचे नातेसंबंध नव्हते. मुक्त व उघड समागम करण्यास परवानगी असे. पाशवावस्थेतून परिणत होत मनुष्य जमाव करून राहू लागला. या यूथावस्थेत नानाप्रकारचे संकीर्ण व्यवसाय स्त्रीपुरुषात होते. त्यांच्या मते युवन् व युवती हे दोन जुनाट शब्द लक्षणीय आहेत. कारण यु म्हणजे जुडणे व युवन् म्हणजे जुडणारा व युवती म्हणजे जुडणारी. संघातील मुलगे व मुली ही समागमयोग्य झाली की आर्ष लोक त्यांना संभोग करू देत. यूथावस्थ समाजात नातेगोते उत्पन्न झालेले नव्हते. परंतु काही भेद व नाती हळूहळू निर्माण झालीच. यूथातील सर्व स्त्रिया सर्व मुलांच्या आया पडल्याने त्याकाळी स्त्रियांस जनि ही संज्ञा असे. पण या अवस्थेत स्त्री व पुरुष हे दोनच भेद होते.[२०] हे भेद हळूहळू वाढत गेले. अतिप्राचीन आर्यसमाजाने स्त्रीसंबंधविषयक नियमन तयार करावयास सुरुवात

केली. त्यातील पहिला बदल म्हणजे मुलांना त्याच्या आईच्या नावाने ओळख–ण्यास सुरुवात झाली. स्त्रिया वंशप्रवर्तक समजल्या जात. पुरुष वंशप्रवर्तक सम–जले जात नसत. त्यात वैशिष्टयीकरण सुरू झाले, सामुदायिक मातृत्व जावून वैयक्तिक मातृत्व आले. यूथात अपत्यांच्या मातांच्या रूपात हे अस्पष्ट कुटुंब झाले. यूथातील प्रजननक्षम अशा सर्व स्त्रियांची अस्पष्ट कुटुंबे झाली, पण ते वेगळे झाले नव्हते. मुक्त समागमास परवानगी होती. पुढे स्त्रियास्त्रियात अपत्यजोपा-सनेमुळे बेबनाव होवून त्या आपल्या अपत्यासह वेगळ्या झोपडया बांधून राहू लागल्या. पण यूथातील वाटेल त्या पुरुषाशी त्यांचा शरीरसंबंध चालू असे. पुरुषांनी मृगया करावी, रानावनातून श्वापदे मारून आणावी व ती कुटुम्बस्थापक स्त्रियांच्या हवाली करून स्त्रिया करतील ते अन्न खावून खुशाल रहावे, असा मनु सुरू झाला. या स्वतंत्र कुटुम्ब स्थापन करणाऱ्या स्त्रिया प्रथम प्रथम एकाच आईच्या पोटी जन्मलेल्या सोदर बहिणी असत. सामायिक यूथसंस्था फोडून विभक्तसंस्था जी जन्मास आली ती यूथातील सोदर बहिणींच्या हस्ते उदयास आली.[२१] यूथावस्थ समाजात बहुपत्नीकत्व व बहुपतिकत्व या दोन्हीही गोष्टी होत्या. सोदर बहिणींच्या कुटुम्बातही या चालींनी शिरकाव केला. सोदर भगिनींनी सोदर भ्रात्यांच्या साह्याने कुटुंबसंस्था स्थापन केल्यावर त्याही संस्थेत पुढे फेरफार झाले. एक भाऊ जास्त गुणवान असल्यास त्याच्याच समागमे राह–ण्याचा काही बहिणींनी निश्चय केला. अशा स्थितीत स्वस्त्रीय बहुपत्नीक व एकपतिक कुटुंबसंस्था निर्माण झाली. त्यातून राजवाडे यांच्या मते आर्य लोकात दोन प्रकारची कुटुम्बे निर्माण झाली. एकात एका पत्नीजवळ अनेक पती राहू लागले व दुसऱ्यात एका भावाजवळ अनेक बहिणी त्यास पती मानून राहू लागल्या. पहिल्या प्रकारात आईच्या नावावरून मुलाचे नाव पडे व दुसऱ्यातही काही काळ तेच होत होते. मातृनामोत्पन्न अपत्यांची त्या काळात अगदी रेलचेल होती.[२२]

यातूनच काही यूथांत प्रजापतिसंस्था निर्माण झाली. प्रजापतिसंस्था म्हणजे एकपतित्वाची संस्था. या काळात कुटुम्बातील मातृप्राधान्य जावून पितृप्राधान्य यावयास पराकाष्ठेचे प्रयत्न करावे लागले. पण एकदा पितृप्राधान्याची उपयुक्तता लोकांस समजताच हळूहळू इतर टोळयाही त्याचे अनुसरण करू लागल्या. आतापर्यन्तच्या स्त्री–पुरुष संबंधांच्या विकासाचे विवरण राजवाडे या प्रमाणे करतात––

१) पाशवावस्थेतील वानरातील एकपतिक सर्वभार्यक समाज.

२) मानवावस्थेतील बहुपतिक बहुभार्याक सरमिसळ करणारा समाज.

३) बहुस्वसृभार्याक बहुभ्रातृपतिक समाज.

४) बहुस्वसृभार्याक एकभ्रातृपतिक समाज व एकभार्याक बहुभ्रातृपतिक समाज.

५) बहुभार्याक एकपतिक समाज उर्फ प्रजापतिसंस्था. [२३]

एकदा प्रजापतिसंस्था स्थापन झाली की त्या संस्थेतील त्या नरास तीन मार्ग मोकळे असत. एक मार्ग म्हणजे स्वतःचे कुटुम्बातील काही प्रिय स्त्रिया नेऊन स्वतंत्र कुटुम्ब स्थापन करणे, वनवास पत्करणे किंवा इतर सरमिसळ व्यवहार करणाऱ्या रानटी लोकात जाऊन प्रजापती नात्याने राहून तेथे प्रजापतिसंस्था स्थापन करणे. या प्रक्रियेतूनच 'मानवसमाजाचा विकास होत गेला. कुटुम्बसंस्थेचा देखील विकास झाला. शांतिपर्वात भीष्माने हा विकास कृत, त्रेता, द्वापार व कलियुगात कसा झाला हे सांगताना म्हटले आहे की केवळ पाशवावस्थेत एक पुरुष व अनेक स्त्रिया असा समाज असे. नंतर यूथावस्थेत अनेक पुरुष व अनेक स्त्रिया यांच्यात सरमिसळ होवून समाज घडला. पुढेपुढे आवडनिवड उत्पन्न होवून मिथुनावस्था हळूहळू अंमलात आली. व शेवटी एक पुरुष व एक स्त्री अशी द्वंद्वावस्था अंमलात आली. कलियुगात द्वंद्वावस्था वा विवाहसंस्था प्रस्थापित झाल्यावर पिता पुत्र, माता, भ्राता, बहीण, मामा वगैरे वर्तमानकालीन नाती समाजाच्या अनुभवास येवू लागली व ती स्थिर झाली. [२४]

या अपूर्ण पुस्तकाच्या शेवटच्या प्रकरणात राजवाड्यांनी भारतीय विवाहसंस्थेतील अग्नी व यज्ञ यांचे स्थान स्पष्ट केले आहे. त्यांचे असे मत होते की माणसाच्या विकासामध्ये अग्नीची भूमिका महत्त्वाची आहे. कारण अग्नीच्या मदतीनेच माणसाने हिंस्र पशूंचे आव्हान परतवून लावले. ते लिहितात, "अग्नीच्या योगाने दाट जंगलाची कुरणे करता आली. स्वैपाक करता येवू लागला. संकटाचा प्रतिकार करता येऊ लागला. सबब या वस्तूवर रानटी आर्यांचे प्रेम बसले. त्यामुळे अग्नीभोवती प्रजोत्पादनाचे कर्म तो करू लागला. यज्ञ ही जी संस्था आर्यांत नंतर उदयास आली तिचा उगम अग्निकुंडाभोवती प्रजोत्पादनाचे जे कार्य चाले त्याच्याशी संबद्ध आहे." [२५] प्रजोत्पादन, अन्नलाभ आणि धनलाभ यज्ञामुळे होतो अशी रानटी आर्यांची समजूत होती. यज्ञामुळे आपणास प्रजोत्पादन होईल अशी लोकांची समजूत असल्यामुळे जुन्या काळातील क्रियांची हुबेहूब नक्कल नंतरचे लोक उठ–

वीत असत. पुत्रलाभार्थ रानटी लोक ज्या क्रिया करीत त्याचीच नक्कल नंतरचे लोक यज्ञसमयी करीत असत. अश्वमेधाच्या विधीवरून राजवाडे यांनी आर्य लोकांच्या समागमाविषयी काही निष्कर्ष काढले आहेत. प्राचीनतम चालीरीतींची नक्कल अश्वमेधात यजमान व याजक संभावितपणे करीत असत; का की नक्कल जशीच्या तशी उठली की इष्टफलप्राप्ती होते असा विश्वास असे. या विश्वासा-पायीच सर्व विवाह अग्निसमक्ष केले जातात. कारण प्रत्येक विवाहाचा मुख्य उद्देश प्रजनन हाच आहे. [२६]

एकदा कुटुंबसंस्था निर्माण झाली की त्यापाठोपाठ इतर संस्था निर्माण होतात कारण आपल्या वासनांच्या पूर्तीसाठी विविधसंस्था निर्माण करणे हा माण-साचा धर्मच आहे. भारतात जातिसंस्था याच कारणासाठी निर्माण झाली. भार-तीय जातिसंस्था व वर्णसंस्था यांच्या उदयाचा व स्थैर्याचा राजवाडे यांनी मूल-गामी अभ्यास केला होता. यातील बरेच महत्त्वाचे विचार त्यांनी ' राधामाधव-विलासचम्पू ' च्या प्रस्तावनेत व इतर फुटकळ निबंधांत मांडलेले आढळतात.

## (५)

जातिसंस्था ईश्वरनिर्मित नसून ती समाजाच्या विकासक्रमात निर्माण झाली असे राजवाडे यांचे मत होते कारण अतिप्राचीनकाळी भारतीय समाज हा लहान-लहान टोळ्यांत व गणांत विभागलेला होता. भारतात आल्यानंतर सुधारलेल्या राज्यकर्त्यांपुढचा महत्त्वाचा प्रश्न या देशातील जे वेगवेगळे रानटी समाज आहेत त्यांचे मूळ समाजात समावेशन कशाप्रकारे करून घ्यावे हा होता. त्याचा उलगडा करण्याचा प्रयत्न राजवाड्यांनीं केला आहे.

' राधामाधवविलासचम्पू'च्या प्रस्तावनेत राजवाडे स्पष्ट करतात की, भारताचा इतिहास हा मुख्यत: चातुर्वर्ण्याचा इतिहास आहे. त्यापूर्वी भारतात गणराज्यसंस्था होती आणि ऋग्वेदातील ब्रह्मणस्पतीचे स्तोत्र हे गणपतीचे व गणराजाचे स्तोत्र आहे. या स्तोत्राचा अर्थ सायनाला समजला नाही पण संस्थांचे इतिहास जाणणारे आपण जे आधुनिक त्यांना तो स्पष्ट दिसतो. यात त्या काळातील गणाच्या पुढाऱ्याचा महिमा वर्णिलेला आहे. या गणात चाल अशी होती की गणातील सर्व स्त्रिया गणपतीकडून प्रजोत्पादन करून घेण्यात भूषण मानीत. गणराज्ये दोन्ही प्रकारची–एकनायकी व बहुनायकी होती. [२७] विविध रानटी समाजाचे हळूहळू मुख्य समाजात समावेशन होण्यास सुरुवात

झाली. पाणिनिकाळी ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे चार वर्ण जाती बनलेले नव्हते. शूद्रांमध्ये पाणिनीच्या मते दोन प्रकार होते– अनिरवसित शूद्र व निरवसित शूद्र. अवसित म्हणजे आत येण्याचे बंद केलेले व अनिरवसित म्हणजे आत येण्याचे अंशत: बंद केलेले. कारागिरादि शूद्र दुसऱ्या प्रकारात बसत तर चांडालादि पहिल्या प्रकारात, जे आत येण्याचे संपूर्ण बंद केलेले होते. त्याचप्रमाणे स्त्रियात पण मातृप्राधान्य व पितृप्राधान्य चाले. हे जे शूद्र होते त्यातील काहींना आर्यांनी ग्रामसंस्थेत जागा दिली आणि आस्ते आस्ते त्यांना कारागिरांच्या दर्जास आणले. मोठ्या प्रमाणात रानटी टोळ्यांचे समाजात समावेशन झाल्यामुळे त्या काळात मोठी सामाजिक क्रांती झाली. या क्रांतीचे राजवाडेकृत कारण पितृसावर्ण्य हे होते. पितृसावर्ण्य म्हणजे आई कोठल्याही जातीची असली तरी पुत्र पित्याचा वर्णाचा समजला जाई. त्यामुळे स्त्रीशूद्राशी संबंधित लोकांनी पितृसावर्ण्याचा फायदा घेऊन सनातन धर्माविरुद्ध बंड पुकारले. या बंडात स्त्रीशूद्रांचा मोठा भाग असल्यामुळे राजवाडे लिहितात, "चातुर्वर्ण्याचा इतिहास म्हणजे त्यातील स्त्रीशूद्रांचा इतिहास प्रामुख्याने आहे. या प्रचंड ऐतिहासिक नाटकात ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य ही तीन पात्रे एका बाजूस आपली आसने सदैव स्थिर करण्यात गुंतलेली दिसतात आणि ती आसनें डळमळविण्याचा भगीरथ प्रयत्न करणारे शूद्र हे पात्र दुसऱ्या बाजूस जीवापाड मेहनत करताना दिसते. या झगड्यात विजयश्री कधी ब्राह्मणादींच्या गळ्यात माळ घालते तर ती कधी शूद्रावर फिदा होते; आणि शेवटी हार दोन्ही पक्ष न खाता तिसरे पात्र जे स्त्री त्याच्याद्वारे तडजोडीने वेळोवेळी भांडण मिटवताना दृष्टीस पडतात."[२८]

ऋग्वेदाच्या पुरुषसूक्तात वर्णन केलेली संस्था ही चातुर्वर्ण्यात्मक वैराज्यसंस्था आहे, ज्याचेद्वारा आर्यांनी आपल्या राज्यांची भरभराट घडवून आणली असे राजवाडे यांचे मत होते. या वैराज्यात शूद्र काबाडकष्टाचे काम करू लागले. (राजवाड्यांचे मते रानटी व वन्य जमातींची चातुर्वर्ण्यात बढती ही त्यांच्या दृष्टीने एक सुधारणा होती), वैश्य धन निर्मू लागले, क्षत्रिय राज्याचे संरक्षण करू लागले व ब्राह्मणांनी वेद निर्माण केले. शूद्रांची परिस्थिती नव्या रचनेमध्ये सुधारली आणि ते चातुर्वर्ण्याचा एक भाग बनले. त्यांना त्यात हक्काचे स्थान मिळाले. ते स्पृश्य व सोंगल समजले जावू लागले. त्यांची रानटी स्थितीतून ग्राम्य स्थितीत बदली झाली. काबाडकष्टाचे दासकर्म शूद्रांनी करावयास सुरुवात केल्यानंतर त्रैवर्णिकांना फुरसत मिळाली व त्यांनी इतर व्यव–

सायास सुरुवात केली. चातुर्वर्ण्यामुळे देशाची भरभराट होते हे लक्षात येताच इतरत्रही त्याचे अनुकरण सुरू झाले. त्यातूनच गौतमबुद्धप्रणीत प्रचंड अशी सामाजिक क्रांती झाली. त्याची क्रांती ही सर्वव्यापी अशी सामाजिक क्रांती होती. या प्रचंड क्रांतीमुळे चातुर्वर्णिक समाजाचे पाये उखडून तो उलटा की सुलटा झाला.[२९] राजवाडे चातुर्वर्ण्याचे व ब्राह्मणश्रेष्ठत्वाचे पुरस्कर्ते असल्यामुळे ते या क्रांतीचे विरोधक होते. त्यांचे असे मत आहे की या क्रांतीपासून ब्राह्मणांनी आपले संरक्षण मातृसावर्ण्याचा कायदा आणून केले. त्यातूनच जातिसंस्था निर्माण झाली. राजवाडे लिहितात, "जाति म्हणून ज्या म्हणतात त्यांचा उदय हिंदू समाजात बौद्ध क्रांतिकाली झाला. शूद्रसमावेश करून घेवून चातुर्वर्ण्याची स्थापना त्रैवर्णिकांनी केली. शूद्रस्त्रीविवाहाचे नियमन मातृसावर्ण्याचे कायद्याने करून जातिसंस्था निर्माण केली."[३०] जाती बनण्याची क्रिया राजवाडे सांगतात त्यापेक्षा जास्त गुन्तागुन्तीची आहे. कारण राजवाडे धर्मशास्त्रांचा आधार घेतात.

हिंदू आपल्या समाजात परकीयांचे समावेशन जातीच्या मार्गाने करीत असत. राजवाडे यांच्या मते हिन्दूंची समावेशनपद्धत जास्त मानवी आहे. कारण त्यांनी इतर रानटी समाजांचा युरोपियांप्रमाणे संहार केला नाही.

एखाद्या रानटी व्यक्तीस जर आर्य समाजात प्रवेश घ्यावयाचा असेल तर त्याच्या प्रवेशार्थ एक बिकट प्रक्रिया होती. भारतातील ग्राम किंवा नगर अठरापगड जातीचे बनलेले असे. प्रत्येक धंद्याची स्वतंत्र जात असून त्या जातींचे गाव बने. प्रत्येक जात आपापल्या धंद्याची वतनदार होती. ज्याला वृत्ती किंवा वतन नाही असा माणूस गावात राहू शकत नसे. इतर एखादा बेकार आर्य माणूस गावात रहाण्याची इच्छा करू लागला तर गावातील वतनदारांची ग्रामसभा भरून त्यांनी एकमताने, बहुमताने नव्हे, परवानगी दिली तर त्याची स्थापना गावात होई व तीही उपरी म्हणून होई. उपरीचा मिरासी होण्यास अनेक पिढ्या जाव्या लागत. ही कथा आर्य उपरींची झाली. अनार्यांना प्रवेश गावसंस्था काही विशेष संस्कार करून देत असे. गुणांनी व कर्मांनी भिन्न अशा अनार्यांना त्यांनी स्वतंत्र जातींत गणून त्यांची ग्रामसंस्थेत स्थापना केली. राजवाड्यांचे असे मत आहे की संकरजातींची बीजक्षेत्रशुद्धी झाल्यावर ज्याप्रमाणे त्यांना तीन, पाच किंवा सात पिढ्यांनंतर पित्याच्या मूळ वर्णात प्रवेश मिळत असे, तशाच प्रकारची सोय जातिसंस्थ अनार्यांना गुणकर्माचा उत्कर्ष केल्यास उपलब्ध करण्यात आली. पण जातिसंस्थेमुळे रक्तशुद्धी, बीज–

शुद्धी आणि बीजक्षेत्रशुद्धी राहाते. आपण आपल्या जीवलगास मुकत नाही, आपली वृत्ती कायम राहाते वगैरे बाबी लोकांच्या ध्यानी आल्या व जाति–संस्था भारतात रुजली. जातीचे वैशिष्ट्य म्हणजे "ज्या समाजाची वृद्धी, फक्त बीजक्षेत्राचा व्यवहार त्या समाजातल्या समाजात होऊन होते, अन्य कोणत्याही मार्गाने होत नाही त्या समाजास जाती म्हणतात. जाती फक्त जन्माने प्राप्त होते."[३१]

लखोटबंद जातीचे कार्य होऊन चुकले आहे व सध्याचा मनु वर्णोन्नती, धर्मोन्नती व आत्मोन्नतीकडे आहे हे राजवाड्यांच्या लक्षात आलेले आहे म्हणून ते म्हणतात की सर्व हिंदूंना वर्णोन्नतीचा अधिकार देवून हिंदूसमाज एकजिनसी बनविला पाहिजे. पण हे काम हळूहळू व धिम्मेपणाने केले पाहिजे. राधामाधवविलासचम्पूच्या प्रस्तावनेत ते स्पष्टच सांगतात की, "वर्णांचे व जातींचे समाजरचनेत जे कार्य व्हावयाचे होते ते बरेच होवून चुकले आहे. याहून उच्चतर समाजरचनेचा काळ यापुढे उगवेल असा निश्चित अंदाज दिसतो. चातुर्वर्ण्य व जाती अनादि नाहीत. सर्व जातींचा एकच सावळा रंग झाल्यामुळे वर्णभेदाचे आता कारण उरलेले नाही. बहुतेक सर्व जाति अन्योन्य वृत्तींचे उल्लंघन गेली हजार वर्ष करू लागल्यामुळे जातिभेदाचीही मातब्बरी वृत्तिदृष्टचा राहिली नाही.' पण जातिसंस्थेबद्दलचे ममत्व लगेच त्यांच्या मनात जागे होते व ते लिहितात, " परंतु पिढीजात म्हणजे पीठिकाजात वांशिक गुणांच्या दृष्टीने जातिसंस्था एकाएकी रासभ्याने मोडणे इष्ट होणार नाही. गुण पिढ्यानुपिढ्या संक्रमण होत होत उपजत होतात. या गुणांचे उपबृंहण व्हावे एतन्निमित्त जातिसंस्था मुद्दाम राखली पाहिजे."[३२] याबाबत त्यांची द्विधा वृत्ती झाली होती.

जातिसंस्था जर कायम ठेवावयाची असेल तर तिला संवर्धित करणारे राज्ययंत्र आवश्यक आहे हे राजवाडे यांनी ओळखले होते. पण राज्यसंस्थेबाबत त्यांचे विचार बरेचसे अस्पष्ट राहिलेले आहेत. 'रामदासा' वरील त्यांच्या लेखात त्यांनी हेगेलच्या राज्यविषयक विचारांचा संदर्भ दिला आहे. ब्राह्मण क्षत्रिय जेथे जात तेथे राज्ययंत्र स्थापन करण्याचा ते खटाटोप करीत असे मतही त्यांनी व्यक्त केले आहे पण त्याबाबत त्यांनी सुसंगत विचार मांडलेले दिसत नाहीत.

(६)

वैराज्यसंस्था स्थापन करून ब्राह्मणक्षत्रियांनी स्वतःचे वर्चस्व प्राचीन भारतीय समाजावर स्थापन केले. राज्यसंस्था समाजावर नियंत्रण मिळविण्यासाठी आवश्यक आहे. कारण राज्ययंत्राच्या द्वारा व्यक्ती आपले मनोगत पूर्ण करू शकते. 'रामदास' या लेखात हेगेलच्या राज्यविषयक विचारांची रामदासाच्या राज्यविषयक विचारांशी तुलना करून राजवाडे लिहितात. "सायुज्यतेचा हेतु मनात धरून मानवसमाज चालला असता तो नीति, धर्म व राज्य या तीन संस्थांचा आश्रय करतो. या आश्रयात ज्याला तो राजकीय, नैतिक व धार्मिक स्वातंत्र्य म्हणून म्हणतो त्याचा त्याला लाभ होतो व हा लाभ बरीच शतके व सहस्रे टिकला म्हणजे तो पूर्ण स्वतंत्र होऊन परमेश्वराशी सायुज्यता पावतो. या राज्यसंस्थेचे तत्त्व समर्थांनी जागोजागी मोठे नामी प्रतिपादिले आहे. व्यक्तीभूत नरदेहाचा आश्रय करून रहाणारा जो आत्मा तो जाणीव आहे. देहाचा लेप बसल्याकारणाने या आत्म्याची ही जाणीव अपूर्ण असते. तेव्हा पूर्ण जाणिवेचा अखंड साठा जो परात्पर आत्मा त्याच्याशी सायुज्यता होण्यास या अपूर्ण जाणिवेला आपल्याहून अधिक जाणिवेचे जे अधिष्ठान त्याचा आश्रय घेणे जरूर आहे. राजा किंवा राज्यसंस्था हे अधिक जाणिवेचे अधिष्ठान आहे." [३३] राज्यसंस्था धर्म व नीतीस साह्य करते म्हणून नीतिमान व धर्मनिष्ठ पुढाऱ्यांनी सडकून कष्ट करून समुदाय करून राज्यस्थापना केली पाहिजे. त्याच मार्गाने जीवात्म्यास मुक्तीचा वा पूर्णस्वातंत्र्याचा लाभ होतो. रामदासाला राजवाड्यांनी हा जो हेगेली पेहराव चढविला आहे तो बराच अप्रस्तुत आहे कारण भारतात रामदासासकट सर्वांनाच राज्यसंस्था हा त्रिगुणात्मक प्रकृतीचा एक आविष्कार वाटत होता आणि तो मुक्तीच्या मार्गातील आधार नसून अडथळा आहे असेच त्यांचे मत होते. हेगेल मात्र तसे समजत नव्हता. त्याचा राज्यसंस्थेकडे पहाण्याचा दृष्टिकोण सकारात्मक होता. पण हेगेलच्या राज्यविषयक तत्त्वज्ञानातील एक धागा राजवाड्यांनी नेमका उचलला होता हे मात्र खरे.

राज्यसंस्था समाजाच्या विविध वासनापूर्त्यर्थ आवश्यक आहे हे सांगत असताना राजवाड्यांनी आशियाई लोकांना एक महामंत्र दिला आहे. ते म्हणतात " एशियातील ज्या कोणा लोकांना स्वातंत्र्याची वासना उत्पन्न होईल, त्यांनी तत्साधनार्थ सोय असेल त्याप्रमाणे, गुप्त अथवा प्रकट रीतीने स्वातंत्र्य-

वासनेचा बळकट धागा अव्याहत चालविणारे एखादे राज्ययंत्रच उभारले पाहिजे सद्वासना किंवा असद्वासना फलद्रूप करण्यास यंत्र व यंत्रणा याच्या निर्माणाखेरीज दुसरा उपाय नाही." राजवाडे यांचा टीकाकार येथे म्हणतो की या महामंत्रावरून हे स्पष्ट होते की राजवाडे हे कम्युनिझमचे पुरस्कर्ते होते. [३४]

भारतात एकसमाजनिर्मिती व एकराष्ट्रनिर्मिती न झाल्यामुळे व जातिगत विभाजनामुळे येथील सर्व सरकारे एकजात पोटबाबू चोरांची झाली असे राजवाडे यांचे मत होते. कारण सरकार म्हणजे एक उपटसुंभ चोरांची टोळी आहे अशी हिंदु गावकऱ्यांची अंतस्थ समजूत असे. सरकार नावाच्या कृत्रिम उपटसुंभ व चोरट्या जुलमी संस्थेबाबत गावकरी पराकाष्ठेचा उदासीन असे. म्हणून राजवाडे यांचे असे मत होते की भारतात सरकार ही संस्था अत्यल्पसंख्यांकांची असे, ती सार्वलौकिक कधीही नसे. [३५] ही अतिशय वेगळी अशी मते राजवाड्यांनी त्यांच्या महिकावतीच्या बखरींच्या प्रस्तावनेत मांडली. भारतात अन्नवैपुल्यामुळे व अन्नसौलभ्यामुळे लोक तुटक, अल्पसंतुष्ट व राज्ययंत्रविरोधी झाले कारण जातिसंस्थ, स्वावलंबी ग्रामव्यवस्थेमध्ये त्यांना इतरांची दखल नको होती. येथे अन्नासाठी संघर्ष झाला नाही उलट बाहेरच्यांना सामावून घेण्यासाठी भारतीयांनी जाती निर्माण केल्या. ग्रामसंस्थेतच लोक संतुष्ट असल्यामुळे त्यापेक्षा मोठे राज्ययंत्र निर्मिण्याचा त्यांनी कंटाळा केला व ज्यांनी ते निर्माण करण्याचा प्रयत्न केला त्यांच्याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे राज्याचे झगडे अल्पसंख्य भुकेबंगाल लढत राहिले. गावकरी आपल्या गावात संतुष्ट होता.

पण या विचाराविरुद्ध थोडेसे बंड उठले. काही लोक त्यावेळी पण म्हणत होते की एक समाज व एक राष्ट्र बनवून स्वराज्य, स्वधर्म व स्वभाषा इत्यादींची स्थापना करा व यथेच्छ संपत्ती मिळवा. हा विचार राजवाड्यांचे मते शहाजी व शिवाजी यांनी केला. शिवाजीने मोठ्या पराक्रमाने स्वराज्य स्थापिले पण शिवाजीच्या मृत्यूनंतर ते शंभरसव्वाशे वर्षांतच लयास गेले. हे असे कां झाले याची मूलगामी कारणमीमांसा राजवाड्यांनी 'राधामाधवविलासचम्पू' च्या प्रस्तावनेत केली आहे.

(७)

महाराष्ट्रात मुसलमानांचे राज्य स्थापन झाल्यानंतर एकूण मराठ्यांची सांस्कृतिक पातळी खालच्या दर्जाची असल्यामुळे त्यांनी सत्ताधाऱ्यास कधीच

आव्हान दिलें नाही. मुसलमानांच्या जागी आपले राज्ययंत्र स्थापावे अशी वासनाच त्यांच्या मनोभूमीत रुजली नाही. बहुसंख्य लोक अज्ञानात व मुसलमानांच्या पाइकीत भूषण मानीत असल्यामुळे जे काही स्वराज्येच्छू ब्राह्मण–क्षत्रिय होते त्यांच्याजवळ मनुष्यबळही नव्हते व द्रव्यबळही नव्हते. राहता राहिले ज्ञानबळ. पण " ते निवृत्तीच्या पाठीमागे लागले होते. निवृत्तीच्या नदीवर गोव्याघ्र व हिंदु–मुसलमान यांना सारखीच तृषा भागविता येत असे." त्यामुळे बलहीन ब्राह्मण व क्षत्रिय स्वतःच करू नये ती यवनाची सेवा पोटाची खाच भरण्यासाठी पत्करीत असत. असल्या हतभाग्यांना कुठला स्वधर्म व कोठले स्वराज्य ? [३६]

पण राजवाडे यांच्या मते मुसलमानांच्या दक्षिणेकडील स्थानास युरोपातील गडबडीमुळे सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धात धक्का बसावयास सुरुवात झाली. कारण द. भारतात नोकरीस येणाऱ्या मुसलमानांची संख्या पोर्तुगीझांच्या चाचेगिरीमुळे रोडावली. त्यामुळे राज्ययंत्र चालविण्यासाठी मुसलमान राजांना मराठ्यांची मदत घ्यावी लागली. त्यातूनच निजामशाहीत व आदिलशाहीत मराठा सरदारांचा उदय झाला. पण या मराठा सरदारांत व वतनदारांत स्वराज्य व स्वधर्म याबाबतचा अभिमान निर्माण झाला नाही. कारण तशी भावना निर्माण होण्याची शक्यता तत्कालीन नीच मराठी संस्थानिकांत नव्हती कारण त्यांच्या दरबारात जपजाप्य करणारी क्षुद्र भिक्षुके व भिकार खर्डेघाशे मुत्सद्दी म्हणून काम पाहात होते. स्वराज्य स्थापिण्याची वा राष्ट्र बनण्याची इच्छा म्हणजे सर्व महाराष्ट्राचा कारभार स्वतः पाहाण्याची उत्कट व जिवंत भावना व्यक्तीच्या मनात निर्माण होणे. ही भावना शहाजीत प्रच्छन्न स्वरूपात होती. कारण राजवाडे यांचे मते स्वतंत्र राज्य स्थापिण्यासाठी खालील बाबींची गरज होती. – १) राष्ट्र होण्याची प्रबल इच्छा २) राज्य व राष्ट्र कमाविण्यासाठी सर्वस्वाची आहुती देण्याची तयारी ३) मुसलमानी राजवटींच्या व्यंगांची माहिती ४) करोल सैन्य ५) कारीगर हत्यार ६) चाणाक्ष व चतुर मुत्सद्दी ७) या सर्व साधनांचा योग्य प्रकारे वापर करण्याची अप्रतिहत पुण्यबुद्धी ८) या बुद्धीस मूर्तरूप देण्यास लागणारे शौर्य आणि ९) मनुष्यमात्रास आपल्या कह्यात वागविण्याचे दुर्मिळ कसब. [३७] राजवाडे असे मत व्यक्त करतात की शहाजी–कालीन मराठी समाजाने फक्त लोक ही संज्ञा आक्रमिली होती. त्याने राष्ट्र ही संज्ञा प्राप्त केलेली नव्हती. ते लिहितात, "आपल्या देशातील सर्व कारभार विशेषतः राजकीय कारभार आपण स्वतः करणार ही भावना ज्या समाजातील बहुतम व्यक्तींचे ठायी प्रादुर्भूत झाली व तत्प्रीत्यर्थ ज्या समाजातील लोक प्राणही

खर्चिण्यास सिद्ध झाले तो समाज राष्ट्र या पदवीस पोहोचला. त्या देशात एक भाषा, एक देश, एक धर्म, एक वंश, एक आचारविचार, एक कायदा इतकी सारी सामान्य बंधने यद्यपि विद्यमान असली आणि राजकीय कारभार स्वत: करण्याची म्हणजे राज्य करण्याची उत्कट इच्छा नसली तर त्या लोकांना राष्ट्र म्हणता येत नाही." [३८] शिवाजीने ही भावना मराठ्यांत निर्माण करून स्वराज्य स्थापन केले. पण शास्त्रीय मागासलेपणा हा सर्व भरतखंडाचाच दोष असल्यामुळे हे स्वराज्य शंभर वर्षांतच इंग्रजांनी अलगद गिळंकृत केले. हे असे का झाले ? राजवाडे यांची याविषयावरची मीमांसा उद्‌बोधक आहे.

राजवाड्यांनी असे मत व्यक्त केले आहे की प्रत्येक संस्कृतीचे अंतिम श्रेष्ठ-कनिष्ठत्व त्या संस्कृतीच्या हत्यारावर अवलंबून असते कारण हत्यार हे त्या संस्कृतीच्या शास्त्रीय प्रगतीचा केवळ निष्कर्ष असतात. जशी ज्या राष्ट्राची संस्कृती तसे तिचे हत्यार. माणूस आपली प्रगती हत्याराच्या बळावरच करीत असतो. उदा. धनुर्धारी राम खनिकर्मकुशल आर्यांपैकी होता व तो शेकडो लोखंडी बाणांनी एतद्देशज रानटी भिल्ल, गोंड, कातकरी, राक्षस वगैरे लोकांचा नायनाट करी व त्यांपैकी कित्येकांना शूद्र बनवून काबाडकष्टाची कामे करावयास लावी. पुढे युरोपियनांनी दारुगोळ्याचा शोध लावून मुसलमानांना स्पेन-मधून हाकालून लावले व सारे जग जिंकण्याची इच्छा धरली. इतकेच काय या युरोपीयांची उष्टी माष्टी, अर्धीमुर्धी दारूगोळा करण्याची विद्या आत्मसात करून मुसलमान या देशातील अर्धवट सुधारलेल्या टाळकुट्या हिंदूंना भेडवीत असत. [३९] ही हत्यारे सर्व भारतीय राजे युरोपीयांकडून विकत घेत असत.

पण ही हत्यारे शहाजीपासून नानाफडणविसापर्यन्त भारतात तयार करण्याची इच्छा कोणास कां झाली नाही ? या प्रश्नाला राजवाडे यांच्या मते उत्तर एकच आहे आणि ते म्हणजे ' उत्तम, रेखीव व नेमके हत्यार बनविण्याची कला पैदा होण्यास शास्त्रीय ज्ञानाची जी पूर्वतयारी राष्ट्रात व्हावी लागते ती त्या काळी महाराष्ट्रात नव्हती. शहाजीच्या हयातीत युरोपात डेकार्ट, बेकन वगैरे विचारवंत सृष्टिसंशोधनाचे वाली ज्यारीने पंचमहाभूतांचा शोध लावण्यास लोकांना प्रोत्साहित करीत होते, आणि आपल्या इकडे एकनाथ, तुकाराम, दासोपंत, निपटनिरंजन वगैरे संत पंचभूतांना मारून ब्रह्मसाक्षात्कारात राष्ट्रात नेवून मुक्त करण्याचे खटपटीत होते. अश्यांना स्क्रू, टाचणी, बंदुक व तोफ यांचा विचार वमनप्राय वाटल्यास त्यात नवल कसचे ! थोडक्यात ऑगस्ट कोंट यांचे भाषेत सांगावयाचे म्हणजे महाराष्ट्र त्या कालात metaphysical अव–

स्थेत होते व positive होण्यास अजून त्यास पाचशे वर्षांचा अवकाश होता."[४०] त्यामुळे युरोपीयांची हत्यारे घेत असताना हळूहळू देश त्यांच्या ताब्यात जात होता कारण "विष नेणून खा की जाणून खा आपला अंमल केल्याशिवाय राहात नाही. ज्या दिवशी व्हास्कोने कालिकतच्या चामुरीच्या थोबाडीत मारली, तोच हिंदुस्थानचे साम्राज्य युरोपियनांच्या हातात जाऊ लागण्याचा पहिला दिवस होता."[४१] लांब पल्ल्याची हत्यारे पाश्चात्य वैज्ञानिक संस्कृतीचा केवल निष्कर्ष होती. या हत्याराच्या जोरावर युरोपियन राष्ट्रांनी सर्व धार्मिक विकृती मुरगाळून टाकल्या. त्रिभुवनविजयी कालत्रयव्यापक भौतिक संस्कृतीच्या प्रवाहाच्या तेजापुढे इतर संस्कृती क्षीण झाल्या. त्यामुळे प्राजक्ताचे झाड हलविले असता फुले जशी टपटपा गळून पडतात तशी गुजरात, कोकण व बंगाल या देशाच्या किनाऱ्यावरील बंदरे पोर्तुगीज लोकांच्या शस्त्राच्या व अस्त्राच्या दणक्यात पटापट त्यांच्या पदरात पडली.[४२]

भारतीयांची संस्कृती युरोपियांपेक्षा हीन दर्जाची असल्यामुळे त्यांचा पराभव होणे अपरिहार्य होते असे राजवाडे यांचे मत होते. कारण मराठ्यांची व भारतीयांची शिक्षणपद्धती मागासलेली होती. त्यामुळे त्यांचे इतिहास व भूगोलविषयक ज्ञान क्षुद्र होते, नव्या शास्त्रांच्या ज्ञानाचा त्यांना गंधही नव्हता. सतत तीनशे वर्षे छापखाना पाहिला असूनही तो निर्माण करण्याची भारतीयांना कधी गरज भासली नाही. याचे कारण या साधनांचा वापर करून घेण्यासाठी जी वैचारिक पूर्वतयारी लागते ती आपल्या देशात झाली नव्हती. याचाच अर्थ भारतीय संस्कृती त्या काळात मागासलेली होती असा होतो.[४३]

राजवाडे यांनी तत्कालीन भारतीय राजकारणावर काही लेख लिहिले होते. त्यांनी इंग्रजी सत्तेचे स्वरूप बरोबर ओळखले होते. ते लिहितात. "इंग्रजी सत्तेचा मुख्य उद्देश द्रव्यहरणाचा आहे. द्रव्यहरणाच्या प्रबल इच्छेने पछाडलेल्या व्यापारी कंपन्या ज्याप्रमाणे monopolies करतात म्हणजे स्वतःच्या शिरजोर अशा सांपत्तिक शक्तीने इतर व्यापाऱ्यांना कुंठित करतात. त्याप्रमाणे इंग्रजी सत्तेस द्रव्यहरणाचे स्वरूप आले आहे."[४४] भारतीय मध्यमवर्गाच्या 'क्रांतिकारक' घोषणांच्या फलनिष्पत्तीबाबत ते साशंक होते. कारण हा वर्ग बोलघेवडा व अवसानघातकी असल्याचे त्यांचे मत होते. म. गांधींच्या राजकारणाला, विशेषतः असहकाराच्या चळवळीला त्यांनी पूर्ण पाठिंबा दिला. म. गांधींच्या अहिंसात्मक असहकाराचे त्यांनी उत्तम विश्लेषण केले होते. टिळक

असते तर ते पण गांधींच्या पाठीमागे उभे राहिले असते असे मत त्यांनी मांडले.४५

(८)

राजवाडे यांच्या सामाजिक, राजकीय आणि ऐतिहासिक विचारांचे विवरण आपण थोडक्यात केले. त्यावरून हे स्पष्ट दिसते की त्यांच्या एकूण विचारांचा संदर्भ लक्षात घेतला असता ते त्यांच्या काळापेक्षा बरेच पुढे होते. परंतु राजवाडे यांचे वेचक विचार हिंदु पुनरुज्जीवनवादी विचारवंतांनी पुढे आणले आणि त्यांचे प्रगतिशील विचार काळाच्या ओघात मागे पडले. पण राजवाडे यांच्या विचारातील काही विकृती सोडल्या तर त्यांचा वारसा प्रगतिशील व क्रांतिकारी विचारांचा होता हे महाराष्ट्रातील प्रागतिकांना फार उशीरा कळून आले. राजवाड्यांच्या जातिसंस्थाविषयक अनुदार व कधीकधी द्वेषमूलक लिखाणामुळे त्यांच्या लिखाणाबद्दल एक प्रकारचा निर्वेद समाजात निर्माण झाला. त्यामुळे त्यांच्या मूळ विचारप्रमेयांवर आपला विचारसंसार थाटणारे महाराष्ट्रातील काही विचारवंत राजवाड्यांचा उल्लेख न करता त्यांची प्रमेये आपणच प्रथम मांडली अशा थाटात लिखाण करू लागले! राजवाड्यांच्या लिखाणात टाकावू काय आहे आणि टिकावू काय आहे याचा मार्क्सवादी पद्धतीने अभ्यास करण्याची जरुरी आहे; कारण राजवाडे यांचे विचार हा आपल्या वैचारिक इतिहासाचा व प्रक्रियेचा एक महत्त्वाचा भाग आहे.

राजवाडे हे संपूर्ण मार्क्सवादी विचारवंत नव्हते आणि त्यांचा भौतिकवाद पण अद्वैत वेदांतासमोर डळमळीत होत असे याचे कारण असे की एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रात जे जे प्रबोधन झाले त्या प्रबोधनाची मुख्य शक्ती ठरलेल्या अद्वैतवेदांताधिष्ठित राष्ट्रवादाचा त्यांच्या मनावर मोठा प्रभाव पडलेला होता. या विचारप्रवाहातील बहुतेक सर्व विचारवंत सामाजिक बाबतीत अनुदार व सनातनी होते. राजवाडे हे शास्त्रीय व भौतिकवादी पद्धतीने इतिहासाचा अभ्यास करणारे असूनही चातुर्वर्ण्यसमर्थनार्थ विवेचनात ते हवी तशी विसंगती पत्करावयास तयार असत. याचे कारण त्यांच्या वैचारिक परंपरेत सापडते.

राजवाडे जेव्हा संशोधन करीत होते त्या काळात इतिहासाच्या अभ्यासाची इतर साधने फारशी उपलब्ध नव्हती. त्यामुळे त्यांचा सारा भर वाङ्-

मयीन साधने, शब्दशास्त्र व भाषाशास्त्रावर होता. उत्खननशास्त्राची त्या काळात फारशी प्रगती झाली नव्हती. मोहोंजोदारो व हडप्पा येथील संस्कृती-बाबतची माहिती त्यांच्या मृत्यूनंतर प्रकाशात आली. ही साधनविपन्नता त्यांनी प्रतिभाशाली विश्लेषणाने भरून काढली !

राजवाडे यांची ज्ञानशास्त्रीय वा प्रमाणशास्त्रीय भूमिका संपूर्ण भौतिकवादी होती. त्याबाबत ते मार्क्सवादाच्या बरेच जवळ पोचले होते. माणसाची मनोरचना व जाणीव भोवतालची परिस्थिती घडवीत असते. माणूस स्थल व काल यांच्या संदर्भातच प्रत्येक विचार करीत असतो वगैरे त्यांचे विचार मार्क्स-वादी प्रमाणशास्त्रास बरेच जवळचे आहेत. त्याप्रमाणेच माणूस हा सतत प्रगती करीत जाणारा प्राणी आहे, जो जो तो सत्याच्या जवळ जातो तो तो त्याच्या मनातील ईश्वरविषयक कल्पना दूर जातात हे त्यांनी ओळखले. समाजविकासाच्या प्रक्रियेत खऱ्यास खोटे व खोटयास खरे मानण्याची एक प्रकारची मिथ्या जाणीव false consciousness माणसात निर्माण होते. जे आहे ते माणूस उलटे पाहू लागतो हे पण त्यांच्या लक्षात आलेले होते. माणूस निसर्गाशी मुकाबला करीत पुढे जात आहे हे ते मान्य करतात पण त्याच्यापुढे ते जात नाहीत. रामदासावरील लेखात त्यांनी हेगेलचे राज्य-विषयक विचार अचूक उचलले पण त्याचा विरोधविकासवाद त्यांनी लक्षात घेतला नाही. कॉ. डांगे म्हणतात, "ते हेगेल व कॉम्टपर्यंत पोचले. पण हेगेलच्या निर्गुण परमात्मवादावरच थाबले. त्याच्यापुढे जावून फायरबाख व नंतर कार्ल मार्क्स व एंजल्स यांच्यापर्यन्त जाण्यास त्याना संधी मिळाली नाही म्हणा किंवा हेगेलियन परब्रह्माचे डायलेक्टिक्स व त्यातून निघणारे विरोधविकासशास्त्र पुरेसे समजावून घेवून त्यांना पुढे सरकणे जमले नाही हे खरे. 'त्यांच्या विकार-विचारसाधनांची उत्क्रांती' या लेखामध्ये त्यांचे मन द्विधा झाले होते व अद्वैतवेदांताच्या जोडीला त्यांनी भौतिकशास्त्रालाही जागा देवून ठेवली. पण मनुष्य समाजाच्या विकासाची प्राकृतिक व ऐतिहासिक द्वंद्वाची गती त्यांना सापडली नाही.'[४६] इतिहासाच्या गतिशास्त्राचे नियम शोधण्याचा त्यांचा प्रयत्न होता व त्यामध्ये त्यांनी काल, स्थान व व्यक्ती हे तीन घटक लक्षात घेतले होते. पण व्यक्ती, काल व स्थान यांच्या अन्योन्य-संबंधाच्या मुळाशी जीवनपोषणार्थ लागणारी अवजारे, हत्यारे व तज्जन्य उत्पादन, वितरण, संभोजन, वर्गसंबंध व जातिसंबंध, राज्ययंत्र ही आहेत त्यातील उत्क्रांतीची एक द्वंद्वात्मक गती आहे या विचारापर्यंत ते येवू शकले

नाहीत असे डांगे यांचे मत आहे.[४७] माणूस हा जरी इतिहासाचा नायक असला तरी तो विशिष्ट उत्पादनसंबंध व विशिष्ट उत्पादनसाधने यांच्या संदर्भात कार्य करीत असतो आणि या सर्व प्रक्रियेची गती विरोधविकासात्मक आहे हे राजवाड्यांनी लक्षात न घेतल्यामुळे त्यांच्या भौतिकवादास आवश्यक असे वैचारिक टोक लाभले नाही, त्यामुळे त्यांनी विसंगत व परस्परविरोधी विचार मांडले. या चातुर्वर्ण्यपेक्षा उच्चतर समाजरचना समाजवाद ही आहे हे न लक्षात घेतल्यामुळे ते चातुर्वर्ण्याकडे पुन: पुन: वळत राहिलेले दिसतात.

राजवाडे यांचे 'भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास' हे अपूर्ण पुस्तक खरोखरच अपूर्व असे आहे. या पुस्तकात त्यांनी स्त्री–पुरुष संबंधांची बदलती रूपे वाङ्मयीन व भाषाशास्त्रीय साधनांच्या साहृयाने दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. राजवाडे व एंजल्स यांच्या विवेचनात बरेचसे साम्य आहे कारण एंजल्स पण राजवाडे सांगतात त्याप्रमाणे स्त्री–पुरुष संबंधातील विविध बदल त्याच्या 'Origin of family, private property and state' या पुस्तकात मांडण्याचा प्रयत्न करितो. कुटुंबसंस्थेच्या सुरुवातीच्या विकासाबाबतच्या दोघांच्या विचारात बरेच साम्य असले तरी त्यातील महत्त्वाचा फरक म्हणजे राजवाडे यांचे विवेचन विवाद्य अशा वाङ्मयीन साधनांवर व प्रतिभाशाली शब्दशास्त्रीय व्युत्पत्तीवर आधारलेले होते. त्याला मानववंशशास्त्रीय आधार नव्हता. या उलट एंजल्सचे पुस्तक मॉर्गनच्या Ancient Society या महत्त्वाच्या ग्रंथावर व त्यातील मूलगामी अशा संशोधनावर आधारलेले होते. दुसरा महत्त्वाचा फरक म्हणजे विवाहसंस्थेमध्ये जे चार बदल घडून आले त्याची ऐतिहासिक कारणे राजवाडे देवू शकलेले नाहीत. आपापसातील बेबनावामुळे स्त्रिया वेगळं घर करून राहिल्या एवढे एकच कारण त्यांनी दिलेले दिसते. पुढील प्रकरणात कॉ. डांगे म्हणतात त्याप्रमाणे " राजवाडे यांच्या चौथ्या प्रकरणाच्या भागात ते स्त्री–पुरुषांच्या सांघिक समागमापासून एक–पति–पत्निक (monogamy) चा ऐतिहासिक विकास कसा दाखवितात याची मला नितांत जरुरी होती. कारण त्या घटनेचा खासगी मालमत्तेच्या व राज्ययंत्राच्या उदयाशी निकट संबंध आहे."[४८] पण तो संबंध दुर्दैवाने राजवाडे दाखवू शकले नाहीत.

भारतीय इतिहासातील मुख्य सामाजिक प्रक्रिया म्हणजे भारतीय समा–जात अनेक असंख्य लहानसहान रानटी टोळ्यांचे समावेशन ही होती. ते सत्य डॉ. कोसंबी यांच्यापूर्वी श्री. राजवाडे यांनी ओळखले आणि हे समावेशन ब्राह्मण क्षत्रियांनी शूद्रास काबाडकष्टाचे काम करावयास लावून जातिसंस्थेच्या

द्वारे केले असे मत मांडले. गौतमबुद्धाच्या काळापर्यन्त लवचीक अशी वर्ण-व्यवस्था होती पण बुद्धोत्तर काळात भारतीय सरंजामशाहीची प्रमुख आधार-स्तंभ असलेली वृत्त्यधिष्ठित जातिव्यवस्था निर्माण झाली. उत्पादनाची व त्यांच्या साधनांची वृद्धी झाली की समाजात श्रमविभागणी होते व काबाड-कष्टाची कामे इतरांना करावयास लावण्याची प्रस्थापितांची वृत्ती बनते हे सत्य राजवाड्यांनी अनेक ठिकाणी मांडलेले आढळते. ब्राह्मणक्षत्रियांनी राज्यसंस्था निर्माण करून वर्णव्यवस्था आणि जातिव्यवस्था बळकट केली; सप्तप्रकृतींनी युक्त असलेले प्रादेशिक राज्य स्थापित केले. या प्रकारात राज-वाडे यांची सहानुभूती ब्राह्मणक्षत्रियांच्या बाजूने असली तरी त्यांना ही गोष्ट कबूल करावी लागली की शूद्रास ही व्यवस्था मान्य नव्हती व ती बदलण्या-करिता तो जीवापाड प्रयत्न करीत होता. वर्णोन्नतीची प्रक्रिया राजवाडे सांग-तात त्या व्यतिरिक्त इतर अनेक मार्गांनी सुरू राहिली कारण वनचरावस्थेतून ग्रामचरावस्थेत येणाऱ्या रानटी लोकांची संख्या सतत वाढत राहिली. या सर्व बदलात खाजगी मालमत्ता व राज्यसंस्था यांची काय भूमिका होती याबाबत राजवाडे मुग्ध राहिलेले दिसतात.

राज्यसंस्था किंवा राज्ययंत्राची भूमिका प्रस्थापित संस्थेस स्थैर्य देण्याची असते. म्हणूनच राजवाडे सांगतात की जेथे जेथे ब्राह्मण-क्षत्रिय गेले तेथे तेथे त्यांचा प्रयत्न राज्ययंत्र स्थापन करण्याचा होता. कारण राज्ययंत्राच्या मदतीने आपण आपले वर्चस्व स्थापन करू याची त्यांना खात्री होती. पण ते राज्ययंत्र जर लोकात रुजलेले नसेल तर ती एक उपटसुंभ व चोरटी यंत्रणा आहे असा त्यांचा ग्रह होतो. राज्ययंत्राच्या वर्गीय स्वरूपाची राजवाड्यांना व्यवस्थित जाण आलेली नव्हती. पण राज्ययंत्र ही एक कृत्रिम, उपटसुंभ व जुलमी संस्था असते आणि तिचा वापर माणूस स्वतःच्या स्वार्थाच्या पूर्तीसाठी एक हत्यार म्हणूनच करतो ही अंधुक जाणीव शेवटी शेवटी त्यांना झालेली होती.

भारतीयांचा पराभव त्यांच्या सांस्कृतिक मागासपणामुळे झाला हे त्यांचे मत आता सर्वमान्य झाले आहे. पाश्चात्य संस्कृतीचे खरे सामर्थ्य तिच्या भौतिक संस्कृतीमध्ये आहे हे पण त्यांनी बरोबर ओळखले होते. कारण प्रत्येक काळाचे युगमाहात्म्य आकलन करण्यावर त्यांचा भर होता; परंतु राष्ट्र ही भावना एकोणिसाव्या शतकात भांडवली विकासाबरोबर उदय पावली. त्यापूर्वी राष्ट्र ही कल्पना पुरस्कारिली गेली नव्हती ही बाबही त्यांनी लक्षात घेतली नाही. सरंजामशाहीत स्वामीभक्ती असते, राष्ट्रवाद नसतो.

(९)

राजवाड्यांच्या विचारातील जो प्रागतिक वारसा आहे तो आता आपण मुक्तमनाने स्वीकारला पाहिजे कारण गेली ५० वर्षे त्यांच्या काही विचारांचा सढळ उपयोग हिंदु राष्ट्रवाद्यांनी करून घेतला. उग्र ब्राह्मणवादाचा व जातिसंस्थेचा त्यांनी पुरस्कार केला, त्यातच त्यांनी पुन्हा हिंदुपदपादशाही किंवा ब्राह्मणपदपादशाही, भटकुलपादशाही वगैरे अफलातून कल्पना मांडल्या, त्यामुळे महाराष्ट्रातील पांढरपेशा ब्राम्हणवर्गाचे डोकेच फिरले हे शेजवलकरांचे मत बरोबर आहे. पण यामुळे ते पुनरुज्जीवनवादी हिंदुराष्ट्रवादी विचारांचे अग्रणी ठरविले गेले. त्यांचे काही विचार प्रागतिकशक्ती व मुसलमान यांच्याविरुद्ध लढण्याचे एक हत्यार म्हणून वापरले गेले. परिणामत: परिवर्तनवादी विचारवंत राज्यवाड्यांपासून दूरच जात राहिला. ' भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास ' या पुस्तकाच्या प्रकाशनामुळे हे अंतर आता कमी होत आहे.

राजवाडे हे भारतातील टिळकपंथी राष्ट्रवादाचे एक अपत्य होते. भारतातील अर्धवट भांडवली विकासामुळे हे राष्ट्रवादी भारतातील जातिसंस्थ सरंजामशाहीच्या सरळ विरोधात कधीच उभे राहिले नाहीत. कारण सरंजामशाहीतून मिळणारा पाठिंबा गमविण्याची त्यांची इच्छा नव्हती. त्यातच वर्णाने ब्राह्मण असल्यामुळे कनिष्ठ जातीयांच्या भावनांची त्यांनी करावी तशी कदर केली नाही. राजवाडे यांचे लिखाण त्याचे जिवंत उदाहरण आहे. पण राजवाडे यांच्याच लिखाणात परिवर्तनवादी विचारांची बीजे मोठ्या प्रमाणात अस्तित्वात होती. पण त्यांचा विकास झाला नाही. आध्यात्मिक राष्ट्रवादी हेगेलच्या विचारांतून ज्याप्रमाणे मार्क्सवाद उदयास आला त्याचप्रमाणे टिळकांच्या आध्यात्मिक राष्ट्रवादातून राजवाडे यांच्या द्वारा डांगे यांचा साम्यवाद उदयास आला. पण भारतातील मार्क्सवादाचे हे द्वंद्वात्मक स्वरूप नीट न समजले गेल्यामुळे त्यांच्याकडे दुर्लक्ष झाले.(दुसरीकडून म. फुले यांच्या विचारांतून संक्रमित होत जवळकरांच्या ' क्रांतीचे रणशिंग ' मध्ये साम्यवादी विचार महाराष्ट्रात पसरले. पण या दोन्ही विचारप्रणाली मार्क्सवादी असूनसुद्धा सहसा एकत्र आल्या नाहीत.)

इतिहासाचार्य राजवाडे यांचे सामाजिक व राजकीय विचार या सर्व कारणांमुळे महाराष्ट्राच्या वैचारिक विकासक्रमातील एक महत्त्वाचा टप्पा आहे.

अशोक चौसाळकर
प्रपाठक, राज्यशास्त्र विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## संदर्भ


१) निफाडकर नाथ "राजवाड्यांची इतिहासशास्त्रमीमांसा" **ऐतिहासिक चर्चा**. राजवाडे संशोधन ग्रंथमाला, धुळे, १९४७. पृ. ३९ व ४८.

२) पुणतांबेकर श्री. व्यं. "इतिहास व इतिहासशास्त्र याबद्दलचे राजवाडे यांचे विचार." **ऐतिहासिक चर्चा** पृ. २२४.

३) **उक्त**, पृ. २२७.

४) **उक्त**, पृ. २३२, ३३.

५) **उक्त**, पृ. २४२, ४३.

६) **उक्त**.

७) राजवाडे वि. का.; **राजवाडे लेखसंग्रह**, संकीर्ण निबंध भाग २, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे १९३२, पृ. ३.

८) राजवाडे वि. का.; **भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास**, प्रागतिक पुस्तक प्रकाशन पुणे १९७६. पृ. ५८.

९) जोशी लक्ष्मणशास्त्री (सं) **राजवाडे लेखसंग्रह**. साहित्य अकादेमी, नवी दिल्ली, १९६७ पृ. २८, २९.

१०) पुणतांबेकर श्री. व्यं. **उक्त**, पृ. २२८–२९.

११) राजवाडे वि. का. 'विकार व विचार प्रदर्शनाच्या साधनांची इतिहासपूर्व व इतिहासोत्तर उत्क्रांती' **राजवाडे लेखसंग्रह** सं. जोशी लक्ष्मणशास्त्री पृ. २.

१२) **उक्त**, पृ. ५.

१३) **उक्त**, पृ. २४–२५.

१४) **उक्त**, पृ. ३०.

१५) **उक्त**, पृ. २८–२९.

१६) राजवाडे वि. का. (सं) **महिकावतीची बखर** चित्रशाळा प्रेस पुणे १९२४. पृ. ९७–९८.

१७) राजवाडे वि. का.; **भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास** पृ. २०–२१.

१८) **उक्त** पृ. ३०. १९) **उक्त** पृ. ३८–४२.

२०) **उक्त** पृ. ४७. २१) **उक्त** पृ. ५४. २२) **उक्त** प. ५८.

२३) उक्त २४) उक्त पृ. ६६–६७. २५) उक्त पृ. ७४.
२६) उक्त पृ. ७८.
२७) राजवाडे वि. का.; राधामाधवविलास चम्पू–प्रस्तावना, चित्रशाळा प्रेस पुणे १९२२ पृ. १७०–७२.
२८) उक्त पृ. १३९. २९) उक्त पृ. १५१.
३०) उक्त पृ. १५४–५५.
३१) जोशी लक्ष्मणशास्त्री (सं) उक्त पृ. ३६–३७.
३२) राजवाडे वि. का.; राधामाधवविलासचम्पू पृ. २००.
३३) जोशी, लक्ष्मणशास्त्री (सं) उक्त पृ. २५०–५२.
३४) निफाडकर नाथ उक्त पृ. ३९.
३५) राजवाडे वि. का. महिकावतीची बखर पृ. ९२–९४.
३६) उक्त पृ. ४६.
३७) उक्त पृ. १२४–१२५. ३८) उक्त पृ. १२३,
३९) उक्त पृ. १०६–१०७. ४०) उक्त पृ. १०७–१०८.
४१) उक्त पृ. १०८. ४२) उक्त पृ. ११६–११७.
४३) जोशी, लक्ष्मणशास्त्री (सं) उक्त पृ. १९२–९३.
४४) राजवाडे वि. का.; राजवाडेलेखसंग्रह भाग २ संकीर्ण निबंध पृ. ९९.
४५) उक्त पृ. २७३–८१.
४६) राजवाडे वि. का.; भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास– श्री. अ. डांगे यांची प्रस्तावना. पृ. २८.
४७) उक्त पृ. १७.
४८) उक्त पृ. १८